न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# चिखली घरकुल परिसरातील पाणी साचण्यावर कायमस्वरूपी उपाययोजनांचे निर्देश

## महापौर रवी लांडगे यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांसह पाहणी; जलनिस्सारण व नाल्यांच्या क्षमतेचा सखोल आढावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे चिखली येथील घरकुल परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचून नागरिकांचे नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवी लांडगे यांनी आज महापालिकेच्या सर्व संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत परिसराची सविस्तर पाहणी करून समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या सूचना दिल्या.



यापूर्वी झालेल्या स्थळ पाहणीदरम्यान नागरिकांना लवकरच सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसह पुन्हा भेट देऊन समस्येचे मूळ कारण शोधून त्यावर शाश्वत उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन महापौरांनी दिले होते. त्या अनुषंगाने आज जलनिस्सारण, स्थापत्य, पाणीपुरवठा तसेच इतर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

यावेळी पाणी साचण्यामागील तांत्रिक कारणांचा सखोल आढावा घेण्यात आला. पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी आवश्यक उपाययोजना, जलवाहिन्या व नाल्यांची क्षमता, अडथळे दूर करणे तसेच भविष्यात अशा परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी दीर्घकालीन आणि शाश्वत नियोजन करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश देण्यात आले.

नागरिकांना पावसाळ्यात कोणताही त्रास होऊ नये आणि त्यांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असून, आवश्यक ती कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचनाही यावेळी देण्यात आल्या.

या पाहणीदरम्यान फ प्रभाग अध्यक्षा शिवानी नरळे, नगरसदस्य कुंदन गायकवाड, निलेश नेवाळे, नगरसदस्या योगिता नागरगोजे, रिटा सानप, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी प्रेरणा सिनकर, उपायुक्त अण्णा बोदडे, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील कार्यकारी अभियंता शिवाजी चौरे, हरविंदर बन्सल, सोहन निकम आदी उपस्थित होते.

### शाश्वत उपाययोजनांवर भर

» पाहणीदरम्यान पाणी साचण्यामागील तांत्रिक कारणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. पावसाच्या पाण्याचा निचरा सुरळीत होण्यासाठी जलवाहिन्या आणि नाल्यांची क्षमता वाढविणे, अडथळे दूर करणे तसेच भविष्यात अशी परिस्थिती पुन्हा उद्भवू नये यासाठी दीर्घकालीन नियोजन करण्याचे स्पष्ट निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. पावसाळ्यात नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी आवश्यक कामे तातडीने पूर्ण करण्यावर भर देण्यात आला.

### सर्व विभागांचा समन्वय

» या पाहणीत फ प्रभाग अध्यक्षा शिवानी नरळे, नगरसदस्य कुंदन गायकवाड, निलेश नेवाळे, योगिता नागरगोजे, रिटा सानप, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जलनिस्सारण, स्थापत्य आणि पाणीपुरवठा विभागांमध्ये समन्वय साधून तातडीने कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी महापालिका कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार यावेळी करण्यात आला.

---

# क्षेत्रीय कार्यालय स्तरावर कचरा प्रक्रिया केंद्रांसाठी जागा निश्चित करण्याचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे निर्देश....

## अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी घेतली संबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांची बैठक....

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील घनकचरा व्यवस्थापन विकेंद्रित करण्याच्या दृष्टीने प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात कचरा प्रक्रिया केंद्र उभारण्याच्या निर्णयाच्या अंमलबजावणीला महापालिकेने गती दिली आहे. या केंद्रांसाठी योग्य जागांची तातडीने निश्चिती करून अत्याधुनिक कचरा प्रक्रिया केंद्र उभारणीचे नियोजन करण्याचे निर्देश पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांना दिले आहेत.



महापालिका सभेत आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी दिलेल्या माहितीनुसार क्षेत्रीय कार्यालय स्तरावर कचरा प्रक्रिया केंद्र उभारण्याच्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि कार्यकारी अभियंत्यांची प्राथमिक बैठक घेतली. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील उपलब्ध जागांचा आढावा घेऊन प्रक्रिया केंद्रासाठी योग्य जागा निश्चित करण्याच्या सूचना या बैठकीत देण्यात आल्या.

शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची स्थानिक पातळीवर प्रक्रिया करण्यासाठी विकेंद्रित यंत्रणा उभारण्यावर महापालिकेचा भर असून, त्यामुळे मोशी येथील कचरा डेपोवरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे. जागा निश्चितीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कचरा प्रक्रिया केंद्रांच्या उभारणीचे काम टप्प्याटप्प्याने हाती घेतले जाणार आहे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी जागा निश्चितीचे काम प्राधान्याने पूर्ण करून प्रक्रिया केंद्र उभारणीचा आराखडा तातडीने सादर करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्षात मोफत बसपास योजना..!

## महापालिका व खासगी शाळांतील इयत्ता 5 वी ते 10 वीच्या विद्यार्थ्यांना लाभ; 15 जुलैपासून अर्ज प्रक्रिया, खासगी शाळांसाठी 25 टक्के शुल्क भरल्यानंतर बसपास उपलब्ध

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना, तसेच महानगरपालिका हद्दीतील शासनमान्य खासगी शाळा व महानगरपालिकेच्या सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना घर ते शाळा व शाळा ते घर अशा स्वरूपाचा बसचा मोफत पास देण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासनमान्य खासगी शाळांतील विद्यार्थ्यांनी बसपासच्या एकूण रकमेपैकी २५ टक्के रक्कम चलनाद्वारे महानगरपालिका कोषागारात भरून ते चलन अर्जासोबत पीएमपीएमएलकडे सादर केल्यानंतर बसपास देण्यात येणार आहे,यास महापालिका सभेने मान्यता दिली आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी मागील शैक्षणिक वर्षात किमान ७५ टक्के उपस्थिती पूर्ण केलेली असावी. विद्यार्थ्याच्या घरापासून शाळेचे अंतर किमान २ कि.मी. किंवा त्यापेक्षा अधिक असणे आवश्यक आहे. ही योजना महानगरपालिका हद्दीतील महानगरपालिका व शासनमान्य खासगी शाळांमधील इयत्ता ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी लागू राहणार आहे.

विद्यार्थ्यांनी निर्धारित नमुन्यातील अर्ज भरून रहिवासी पुरावा, आधार कार्ड अथवा इतर पत्ता असलेले ओळखपत्र, शाळेचे प्रमाणपत्र तसेच दोन पासपोर्ट आकाराचे फोटो जोडून संबंधित शाळेत जमा करावेत. खासगी शाळांतील विद्यार्थ्यांनी निर्धारित रक्कम पीएमपीएमएलच्या अधिकृत डेपोमध्ये भरून अर्ज सादर करावेत, तर महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांना बसपास पूर्णपणे मोफत देण्यात येणार आहे.

योजनेअंतर्गत अर्ज वाटप व स्वीकार प्रक्रिया १५ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत होणार असून, बसपास तयार करणे व वितरण १५ जुलै ते ३१ ऑगस्ट २०२६ दरम्यान करण्यात येईल. या बसपासचा लाभ ३० जून २०२७ पर्यंत उपलब्ध राहणार आहे.

महानगरपालिकेने सर्व मुख्याध्यापकांनी पात्र विद्यार्थ्यांची यादी वेळेत सादर करून अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळवून द्यावा, पालकांनीही निर्धारित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करून आपल्या पाल्यांसाठी मोफत बसपास योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.




### विद्यार्थ्यांसाठी मोफत बसपास योजना

**» पिंपरी-चिंचवड महापालिकेने इयत्ता पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांसाठी घर ते शाळा आणि शाळा ते घर या प्रवासासाठी मोफत बसपास योजनेला मंजुरी दिली आहे. महापालिका शाळांतील विद्यार्थ्यांना पूर्णपणे मोफत पास मिळणार असून, शासनमान्य खासगी शाळांतील विद्यार्थ्यांना बसपास शुल्काच्या २५ टक्के रक्कम भरावी लागेल. पात्रतेसाठी मागील शैक्षणिक वर्षात किमान ७५ टक्के उपस्थिती आणि घर ते शाळा किमान दोन किलोमीटर अंतर आवश्यक आहे. ही योजना ३० जून २०२७ पर्यंत लागू राहणार असून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी मोठा दिलासा ठरणार आहे.**

### अर्ज प्रक्रिया व आवश्यक कागदपत्रे

**» बसपाससाठी विद्यार्थ्यांनी निर्धारित अर्जासोबत रहिवासी पुरावा, आधार कार्ड किंवा पत्त्याचा पुरावा, शाळेचे प्रमाणपत्र आणि दोन पासपोर्ट आकाराचे फोटो सादर करणे आवश्यक आहे. महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांनी अर्ज शाळेत जमा करायचा आहे, तर खासगी शाळांतील विद्यार्थ्यांनी पीएमपीएमएलच्या अधिकृत डेपोमध्ये शुल्क भरून चलनासह अर्ज सादर करावा. अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया १५ ते ३१ जुलै २०२६ दरम्यान होणार असून, बसपास वितरण ३१ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.**

### पालक व शाळांना महापौरांचे आवाहन

**» महापौर रवी लांडगे यांनी सर्व मुख्याध्यापकांनी पात्र विद्यार्थ्यांची यादी वेळेत सादर करून अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी, तसेच जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन केले आहे. पालकांनीही मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करून आपल्या पाल्यांसाठी बसपास मिळवावा, असे त्यांनी सांगितले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा प्रवास खर्च कमी होणार असून सुरक्षित आणि नियमित शालेय प्रवासाला चालना मिळणार आहे.**

---

# धरणे भरली तरी सांगवीकर तहानले; पाणीटंचाईमुळे नोकरदार महिलांचे हाल

## एक दिवसाआड आणि कमी दाबाने पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त; गढूळ पाणी, जीर्ण जलवाहिन्या आणि ठेकेदारांच्या कारभारावर संताप

**पिंपरी | प्रतिनिधी**

सांगवी पाणीपुरवठा विभागाच्या अत्यंत ढिसाळ नियोजनामुळे सांगवीकरांचे जीवन विस्कळीत झाले आहे. पाणीकपातीच्या नावाखाली लादलेल्या या अकार्यक्षम पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांचे, विशेषतः नोकरदार महिलांचे प्रचंड हाल होत आहेत.

पाणीटंचाईचा सर्वाधिक फटका आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांना बसत आहे. रात्री उशिरापर्यंत काम करणाऱ्या आणि शिफ्टमध्ये काम करणाऱ्या या महिलांना पाणी भरण्यासाठी पहाटे पाच वाजता उठावे लागत आहे. अपुऱ्या झोपेमुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असून, त्याचा थेट फटका त्यांच्या नोकरीवरही बसत आहे. सकाळी पाणी भरण्यात वेळ गेल्यामुळे ऑफिसच्या वेळेवर पोहोचणे कठीण होत आहे. घर सांभाळायचे की नोकरी करायची?, असा संतप्त सवाल या महिलांनी उपस्थित केला आहे.

शहराला पाणी पुरवणारी धरणे ७० टक्क्यांहून अधिक भरलेली असतानाही सांगवीकरांना पाणीटंचाईची झळ बसत आहे. इतर भागांत ९०० ते १००० चा फ्लो दिला जात असताना, सांगवीतील दोन्ही टाक्यांसाठी केवळ ३०० ते ४०० चा फ्लो का?, पिंपळे गुरवच्या जलवाहिनीवर पाणी वळवून सांगवीकरांच्या हक्काच्या पाण्यावर डल्ला मारण्याचे हे षडयंत्र कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे? धरणात पाणी असूनही सांगवीकरांना कोरड्या नळाची शिक्षा का दिली जात आहे, याचे उत्तर पाणीपुरवठा विभागाने द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



### पाणीपुरवठा विभागाचा निष्काळजीपणा

**» पाणीपुरवठा करणाऱ्या टाक्यांवर पालिकेचा एकही जबाबदार कर्मचारी उपस्थित नसून, सगळा कारभार ठेकेदारांच्या माणसांच्या हवाली असल्यामुळे ही परिस्थिती ओढवली असल्याचे बोलले जात आहे. अनेक वर्षांपूर्वीच्या जीर्ण पाइपलाइनमुळे नळातून दूषित आणि गढूळ पाणी येत आहे. पाणीपुरवठा विभागाच्या मनमानी कारभारामुळे पाण्याचा दाब अत्यंत कमी असल्याने नागरिकांना नळासमोर तासनतास ताटकळत उभे राहावे लागत आहे.**

# अस्वच्छता करणाऱ्या बेकऱ्यांवर महापालिकेचा दंडाचा बडगा

## सॅलिसबरी पार्कमधील दोन बेकरींवर 50 हजारांचा दंड; सांडपाणी नाल्यात सोडल्याप्रकरणी कारवाई

**पुणे | प्रतिनिधी**

सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या दुकानदारांवर कारवाईचा बडगा महापालिकेने उगारला आहे. महापालिकेच्या घनकचरा विभाग, आरोग्य विभाग तसेच क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने धडक कारवाई केली जात आहे.

'स्वच्छ पुणे सुंदर पुणे' ही संकल्पना महापालिकेच्या वतीने राबविली जात आहे. पुणे महापालिकेला स्वच्छतेसाठी केंद्र सरकारच्या वतीने विविध पुरस्कारांनी सन्मानित देखील करण्यात आले आहे. सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविण्यास कारणीभूत ठरणाऱ्या घटकांमुळे महापालिकेला विनाकारण मनस्ताप सहन करावा लागतो. महापालिकेच्या कारभारावर टीका होते.

शहरात अस्वच्छता निर्माण करणाऱ्यांच्या विरोधात महापालिकेचे कारवाईचे पाऊल उचलले आहे. सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरवणाऱ्या आणि व्यवसायाच्या ठिकाणचे सांडपाणी थेट नाल्यात सोडणाऱ्या दोन बेकरी व्यावसायिकांवर महापालिकेने कारवाई केली आहे. अस्वच्छता केल्याप्रकरणी पालिका प्रशासनाने या बेकरी व्यावसायिकांकडून पालिका प्रशासनाने प्रत्येकी २५ हजार या प्रमाणे ५० हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे.

महापालिकेच्या घनकचरा विभाग तसेच कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालयाच्या माध्यमातून ही कारवाई करण्यात आली. सॅलिसबरी पार्क परिसरातील 'गोल्डन बेकरी' आणि 'इंडियन बेकरी' या दुकानांवर कारवाई करून त्यांच्याकडून महापालिकेच्या पथकाने हा दंड वसूल केला. सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या तसेच सांडपाणी बेकायदा पद्धतीने ड्रेनेज लाईन तसेच नाल्यांमध्ये सोडणाऱ्या व्यावसायिकांच्या विरोधात महापालिकेने मोहीम सुरू केली आहे. यामध्ये महापालिकेची पथके प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करून दंडात्मक कारवाई करीत आहेत.

महापालिकेच्या पथकांकडून प्रभाग क्रमांक २२, २३ आणि २४ मध्ये एकत्रित तपासणी मोहीम राबविण्यात आली. यावेळी सॅलिसबरी पार्क परिसरात असलेल्या या दोन्ही बेकऱ्या अस्वच्छता करीत असल्याचे समोर आले. त्यांनी बेकायदा पद्धतीने सांडपाणी ड्रेनेज लाईन आणि नाल्यात सोडल्याचे महापालिकेने केलेल्या तपासणीत समोर आले. त्यानंतर महापालिकेच्या पथकांनी तातडीने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून संबंधितांकडून ५० हजार रुपयांचा दंड वसूल केला.




### दोन बेकरींवर ५० हजारांचा दंड

» महापालिकेच्या घनकचरा विभाग आणि कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालयाने सॅलिसबरी पार्क परिसरातील गोल्डन बेकरी आणि इंडियन बेकरीवर धडक कारवाई केली. सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणे आणि सांडपाणी थेट नाल्यात सोडल्याप्रकरणी दोन्ही बेकरींकडून प्रत्येकी २५ हजार रुपये, असा एकूण ५० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. शहरातील स्वच्छता राखण्यासाठी अशी कारवाई पुढेही सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### 'स्वच्छ पुणे' मोहिमेला बळ

» महापालिकेने राबविलेल्या 'स्वच्छ पुणे, सुंदर पुणे' अभियानाला अधिक प्रभावी करण्यासाठी अस्वच्छता करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम सुरू केली आहे. घनकचरा विभाग, आरोग्य विभाग आणि क्षेत्रीय कार्यालयांची संयुक्त पथके शहरभर तपासणी करत आहेत. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, सांडपाणी बेकायदा नाल्यात सोडणे किंवा स्वच्छतेच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई केली जात आहे.

### प्रभाग २२ ते २४ मध्ये विशेष तपासणी

» महापालिकेच्या पथकांनी प्रभाग क्रमांक २२, २३ आणि २४ मध्ये संयुक्त तपासणी मोहीम राबविली. पाहणीदरम्यान सॅलिसबरी पार्कमधील संबंधित बेकऱ्यांकडून सांडपाणी ड्रेनेज लाईन आणि नाल्यात सोडले जात असल्याचे आढळून आले. त्यानंतर तातडीने दंडात्मक कारवाई करण्यात आली. शहरातील व्यावसायिकांनी स्वच्छतेचे नियम पाळावेत, अन्यथा अशाच प्रकारची कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिकेने दिला आहे.

# यंदाच्या पुणे ग्रँड टूर स्पर्धेसाठी 130 किलोमीटरचे रस्ते होणार आंतरराष्ट्रीय दर्जाचे !

## पुणे ग्रँड टूर आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेसाठी महापालिका तब्बल 167 कोटी खर्च करून 130 किलोमीटर रस्त्यांचा कायापालट करणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे ग्रँड टूर आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धे'ची तयारी महापालिकेने सुरू केली आहे. या स्पर्धेसाठी यंदा शहरातील सुमारे १३० किलोमीटर रस्त्यांची दुरुस्ती आणि पुनर्डांबरीकरण केले जाणार आहे. यासाठी १६७ कोटी रुपयांच्या पूर्वगणनपत्रकाला महापालिकेच्या पूर्वगणन समितीने मान्यता दिली.

या स्पर्धेसाठी आवश्यक असलेली कामे करण्यासाठी महापालिकेने चार टप्पे केले आहेत. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या पुढाकारातून झालेली ही स्पर्धा यंदा पुन्हा होणार आहे. पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्यातील काही तालुक्यातील मार्ग निश्चित करण्यात आला आहे. या स्पर्धेसाठी सुमारे ७०० किलोमीटरहून अधिकच्या रस्त्यांची कामे केली जाणार आहेत. यामध्ये रस्त्यांची दुरुस्ती आणि पुनर्डांबरीकरण यांचा समावेश आहे.

गेल्या वर्षी या स्पर्धेनिमित्त ४५० किलोमीटर रस्त्यांची कामे करण्यात आली. याच पद्धतीने यंदाही रस्त्यांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. त्यासाठी सुमारे १६७ कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय मानकांनुसार रस्ते असणे आवश्यक आहे. यंदा पुणे शहरातील १३० किलोमीटर लांबीचा सायकल मार्ग दुरुस्त केला जाणार असून, रस्त्यांच्या पुनर्डांबरीकरणाची कामे केली जाणार आहेत.



### रस्त्यांच्या कामाचे टप्पे

» पहिला टप्पा : औंध, बाणेर, पाषाण, विद्यापीठ, रेंजहिल्स – २५.४४ किलोमीटर
» दुसरा टप्पा : सेनापती बापट रस्ता, कोथरूड, कर्वेनगर, सिंहगड रस्ता, पर्वती पायथा, सारसबाग, खडकवासला – ३७.०२ किलोमीटर
» ·तिसरा टप्पा : मध्यवर्ती पेठांचा भाग, शिवदर्शन, गंगाधाम, कोंढवा, कॅम्प, येवलेवाडी येथून पुढे – ४४.५७ किलोमीटर
» चौथा टप्पा : भैरोबा नाला, मगरपट्टा, मुंढवा, नॉर्थ मेन रोड, विधान भवन, गणेश रोड, गोखले रस्ता, डेक्कन – २८.७२ किलोमीटर

# मेट्रोच्या कामापूर्वीच ‘सनसिटी-कर्वेनगर उड्डाणपूल’ होणार सुरू

## सिंहगड रस्त्यावरील गंगा भागोदय चौकातून थेट कर्वेनगर आणि कर्वे रस्त्याकडे जाता येणार; धायरी आणि नांदेड सिटीकरांचा प्रवास होणार सुसाट.

**पुणे | प्रतिनिधी**

सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी राजारामपूल ते फनटाईमपर्यंतचा उड्डाणपूल उभारण्यात आल्यानंतर आता महापालिकेने सनसिटी ते कर्वेनगरला जोडणाऱ्या उड्डाणपुलाच्या कामाला गती दिली आहे. सिंहगड रस्त्यावर महामेट्रो पुढील काही महिन्यांत खडकवासला ते खराडी मेट्रो मार्गाचे काम सुरू करणार आहे. यामुळे सिंहगड रस्त्यावरील संभाव्य वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महापालिकेने हा पूल पुढील अडीच महिन्यात सुरू करण्याचे नियोजन केल्याची माहिती महापालिकेच्या प्रकल्प विभागाचे प्रमुख दिनकर गोजारे यांनी दिली.



तसेच, या पुलाच्या कामाचा दररोज आढावा घेतला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले. महापालिकेने या पुलाचे काम दोन वर्षांपूर्वी सुरू केले असून जवळ जवळ ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. पूलाच्या दोन्ही बाजूस असलेल्या जोडरस्त्याचे भूसंपादन करण्यासाठी प्रशासनाने हालचाली सुरू केल्या आहेत. सिंहगड रस्त्यावरून गंगा भागोदय चौकातून येणारी वाहने या पुलावरून थेट कर्वेनगर आणि कर्वे रस्त्याकडे जाणार असून सुमारे तीन ते किलोमीटरचा वाहनांचा वळसा कमी होणार आहे.

त्यामुळे.सिंहगड रस्त्यावर मेट्रोचे काम सुरू करण्यापूर्वी हा पूल झाल्यास धायरी, नांदेड सिटीकडून येणाऱ्या वाहनांना अडथळ्याविना पुढे जाता येणार आहे. त्यामुळे महामेट्रोने हा पूल सुरू झाल्याशिवाय काम सुरू करू नये अशी स्थानिक नागरिकांची मागणी आहे.

हा पूल सुरू झाल्यानंतर या पुलावरून मोठ्या प्रमाणात कर्वेनगरमध्ये वाहने येणार आहे. मात्र, या वाहनांना कर्वे रस्ता तसेच डीपी रस्त्याकडे जाण्यासाठीच्या शिवणे- खराडी रस्त्याचे भूसंपादन अनेक भागात रखडले आहे. परिणामी, हे भूसंपादन झाले नाही तर कर्वेनगर भागात बॉटलनेक तयार होणार आहे. यामुळे या भागातील वाहतूक वाढणार आहे. त्यामुळे लिंक रस्ते झाल्याशिवाय हा पूल सुरू करू नये, अशी कर्वेनगरमधील स्थानिक नागरिकांची मागणी आहे. त्यामुळे, महापालिकेचा पथ विभाग तसेच शहर अभियंता विभागाकडून तातडीनं या जागा ताब्यात घेण्याची प्रक्रीया सुरू केली आहे.

### अडीच महिन्यांत पूल सुरू करण्याचे लक्ष्य

» महापालिकेने सनसिटी ते कर्वेनगर जोडणारा उड्डाणपूल पुढील अडीच महिन्यांत वाहतुकीसाठी खुला करण्याचे नियोजन केले आहे. प्रकल्प विभागाचे प्रमुख दिनकर गोजारे यांनी पुलाच्या कामाचा दररोज आढावा घेण्याचे निर्देश दिले आहेत. दोन वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या प्रकल्पाचे सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाले असून, उर्वरित काम वेगाने पूर्ण करण्यावर भर दिला जात आहे. सिंहगड रस्त्यावर मेट्रोचे काम सुरू होण्यापूर्वी हा पूल सुरू करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.

### वाहतूक कोंडीवर मोठा दिलासा

» हा उड्डाणपूल सुरू झाल्यानंतर गंगा भागोदय चौकातून येणाऱ्या वाहनांना थेट कर्वेनगर आणि कर्वे रस्त्याकडे जाता येणार आहे. त्यामुळे सुमारे तीन किलोमीटरचा वळसा वाचणार असून सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. धायरी, नांदेड सिटी आणि परिसरातील वाहनचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. स्थानिक नागरिकांनीही मेट्रोचे काम सुरू करण्याआधी हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्याची मागणी केली आहे.

### जोडरस्त्यांचे भूसंपादन अजूनही आव्हान

» उड्डाणपूल पूर्णत्वाकडे जात असला तरी जोडरस्त्यांच्या भूसंपादनाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. शिवणे–खराडी डीपी रस्त्यासह कर्वेनगरकडे जाणाऱ्या मार्गांवरील काही जागा ताब्यात घेणे बाकी आहे. हे काम वेळेत पूर्ण न झाल्यास कर्वेनगर परिसरात 'बॉटलनेक' निर्माण होऊन वाहतूक कोंडी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांनी लिंक रस्ते पूर्ण झाल्यानंतरच पूल सुरू करण्याची मागणी केली असून महापालिकेने भूसंपादन प्रक्रिया वेगाने सुरू केली आहे.

# जुन्नर तालुक्यात गायरान जमिनींवर अतिक्रमणाचा विळखा; शासनाकडून विशेष मोहिमेची मागणी

## जनावरांच्या चराईसाठी राखीव जमिनींवर घरे, व्यावसायिक बांधकामे; महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील अनेक गावांमध्ये गायरान जमिनींवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचे समोर येत आहे. जनावरांसाठी आणि सार्वजनिक हितासाठी राखीव ठेवलेल्या या जमिनींचा मूळ उद्देश धोक्यात आला असून, अनेक ठिकाणी घरे, व्यावसायिक बांधकामे आणि इतर वापर सुरू असल्याची माहिती पुढे येत आहे. त्यामुळे शासनाने विशेष मोहीम राबवून गायरान जमिनी पुन्हा ताब्यात घ्याव्यात, अशी मागणी नागरिक आणि पशुपालकांकडून होत आहे.



गावातील जनावरांना चारण्यासाठी आणि सार्वजनिक उपयोगासाठी प्रत्येक गावात काही प्रमाणात गायरान जमीन राखीव ठेवण्यात आलेली आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून या जमिनींवर टप्प्याटप्प्याने अतिक्रमण वाढत गेले असून, अनेक ठिकाणी गायरानक्षेत्राचे स्वरूपच बदलून गेले आहे.

गायरान जमिनींचे संरक्षण करण्याची जबाबदारी ग्रामपंचायत प्रशासन आणि महसूल विभागावर आहे. ग्रामसेवक आणि तलाठी यांनी नियमित पाहणी करून अतिक्रमण रोखणे अपेक्षित असतानाही अनेक ठिकाणी त्याकडे दुर्लक्ष झाल्याची भावना ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत. वेळेवर सर्वेक्षण आणि कारवाई न झाल्याने अतिक्रमणकर्त्यांचे मनोबल वाढल्याचेही बोलले जात आहे.

गायरान जमिनींची अचूक मोजणी करून अतिक्रमणांची नोंद घ्यावी, दोषींवर कारवाई करावी आणि सार्वजनिक मालमत्ता पुन्हा शासनाच्या ताब्यात आणण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिक आणि पशुपालकांकडून जोर धरत आहे.

### अनेक गावांमध्ये अतिक्रमणांचे जाळे

» येडगाव, हिवरे तर्फे नारायणगाव, ओतूर, आळे या मोठ्या गावांसह इतर अनेक ठिकाणी गायरान जमिनींवर अतिक्रमण झाल्याची चर्चा आहे. जळगाव येथील कैलासनगर परिसरात मोठ्या प्रमाणात बांधकामे झाल्याचे सांगितले जाते. काही गावांमध्ये शाळा, मंदिरे तसेच इतर सार्वजनिक स्वरूपाची बांधकामेही गायरानक्षेत्रात उभारण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. राजुरी येथेही काही गायरान जमिनींचा खासगी आणि व्यावसायिक वापर होत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.